PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Suwasini
Year: 1961

Song: Kal Me Raghunandan Pahile
Lyricist: Ga. Di. Madgulkar

आ...
काल मी रघुनंदन पाहीले
काल मी रघुनंदन पाहीले
काल मी रघुनंदन पाहीले
शाम मनोहर रूप पाहता
पाहतची राहीले
रघुनंदन पाहीले
काल मी रघुनंदन पाहीले

विसरून मंदिर विसरून पूजा
मनी पुजिला तो युवराजा
विसरून मंदिर विसरून पूजा
मनी पुजिला तो युवराजा
अबोध कसले अश्रू माझ्या
डोळ्यातून वाहीले
रघुनंदन पाहीले
काल मी रघुनंदन पाहीले

वीर वेश ते तरूण धनुर्धर
जिंकून गेले माझे अंतर
वीरवेश ते तरूण धनुर्धर
जिंकून गेले माझे अंतर
त्या नयना चंद्रबाण मी
हृदयी या साहीले
रघुनंदन पाहीले
काल मी रघुनंदन पाहीले

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*